Review Of Research
ISSN 2249-894X


Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 5 | Issue - 2 | Nov - 2015

# ‘‘जिजाबाईचे सामाजिक कार्य’’

प्रा. राजेश हिरालाल घोडेस्वार
इंदिरा गांधी कला—वाणिज्यमहाविद्यालय
कळमेश्वर, जि.नागपूर

## प्रस्तावना :—

भारताच्या इतिहासाच्या जडणघडणीत ज्या स्त्री—पुरुषांचे योगदान अतुलनीय असे आहेत त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाईचे स्थान अतिउच्च दर्जाचे आहे. सतराव्या षतकात महाराष्ट्रातछत्रपती शिवाजीमहाराजांच्या नेतृत्वात मराठयांचे स्वतंत्र राज्य उदयास आले. या कार्यात शिवाजीमहाराजांना मातोश्री जिजाबाईची प्रेरणा आणि मार्गदर्षन मोलाचे ठरले. जिजाबाई केवळ पूत्राला जन्म देणारी व दागिण्याचा सोस मिरविणारी सामान्य स्त्री नव्हती, तर आपल्या कर्तृत्वाने समाज घडविणारी युगप्रवर्तक स्त्री होती. स्वत:च्या मार्गदर्शनाखाली मराठयांचे संघटीत स्वराज्य उभारून जिजाबाईने स्वराज्याच्या कारभारातही हिरिरिने भाग घेतला. त्याचबरोबर तत्कालीन सामाजिक व्यवस्थेत प्रचलित असलेल्या बुरसटलेल्या प्रतिगामी रितीरिवाजांवर कठोर प्रहार करून महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेचा पाया घातला.राजमाता जिजाबाईच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकणे हा या शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश आहे.



## विषय प्रवेश:—

शहाजीराजेंना निजामशहातर्फे पुणे, सुपे, इंदापूर व चाकण या परगण्यांची जहागिरी वंषपरंपरागत मिळालेली होती. शहाजीराजेंच्याव्यक्तिगत द्वेशापायी आदिलशाही सरदार मुरारजगदेवाने पुणे जहागिरीची दुर्दशा केली. त्या जहागिरीत लोकांनी पुन्हा वस्ती करू नये म्हणून पुणे कसबा उध्वस्त केला. व त्यावर गाढवाचा नांगर फिरवीला. तेथे बाराफुटी पहार रोवून त्यावर तुटलेल्या चपलेचा तुकडा, बेकाम झाडू, फुटलेली कवडी टांगुन ती भूमी शापीत म्हणून घोशीत केली. त्यामूळे पुण्यातील लोक निर्वंष होण्याच्या भितीने पुणे सोडुन इतरत्र निघुन गेले. म्हणून अनेक वर्श पुणे ओस पडुन राहिले. इ.स. १६३६ मध्ये शहाजीराजांनी आदिलशहाची नोकरी पत्करली. त्यावेळेस आपल्या पुणे जहागिरीची संपूर्ण व्यवस्था पत्नी जिजाबाईकडे सोपवून शहाजीराजे कर्नाटकातील कामगिरीवर निघुन गेले. तेव्हा जिजाबाई बालशिवाजीला घेवून पुणे जहागिरीत आल्या. सनातनी वर्गाने निर्माण केलेल्या धार्मिक दहशतीखाली तत्कालीन समाज होता. समाजमनातून धार्मिक दहशत, दैववाद, अंधश्रध्दा व निरर्थक रूढी काढून टाकल्याशिवाय कल्याणकारी राष्ट्रनिर्मितीची बीजे पेरता येणार नाही याची जिजाबाईला जाणीव झाली. म्हणून त्यांनी लोकांचे मनातील भीती कमी करण्याचे हेतूने लोकांनाशास्त्रनियमांची निरर्थकता पटवून दिली. पुण्याच्या शापीत भूमीवरून नांगरणी करण्याचा जिजाबाईने निर्णय घेतला.

त्याकरीता जहागिरीचा कारभारी दोदोजी कोंडदेव यांना सोन्याचा नांगर तयार करण्याचा आदेष दिला. जिजाबाईने तो सोन्याचा नांगर बालशिवाजीच्या हाती दिला. शिवाजीने आपल्या सवंगडयासह कसब्याच्या भूमिवरून नांगरणी केली व धार्मिक दहशतीचे प्रतीक असलेली पहार उपटुन काढली. धर्मशास्त्राने निशिध्द ठरविलेल्या व निर्वंष होण्याची दहशत पसरविलेल्या भूमिवर आपल्या पूत्राला नांगरणी करावयास लावणारी जिजाबाई ही सांस्कृतिक व धार्मिक दहशतीतून रयतेला बाहेर काढणारी पहिली स्त्री होय.जिजाबाईच्या या पुरोगामी कृत्यामूळे लोकांच्या मनातील धार्मिक दहशत दूर होवून लोक पुणे कसब्यात वस्ती करू लागले.

जिजाबाईचा सामाजिक व धार्मिक दृष्टीकोन त्या काळातही पूर्णपणे स्वतंत्र होता. त्यांनी धार्मिक बाबतीत केलेली महत्वपूर्ण सुधारणा म्हणजे षुध्दीकरण होय.इस्लामी अत्याच्याराला कंटाळुन अनेक हिंदु इस्लाम धर्माचा स्वीकार करित असे. परंतू कालांतराने अषा धर्मांतरीतांचे मन पुन्हा आपल्या स्वर्धमात येण्यासाठी घुटमळत असे. मात्र त्याकाळाच्या सनातनी रूढीप्रमाने हिंदू धर्मातून परधर्मात गेलेल्यांना पुन्हा हिंदु धर्मात प्रवेश नाकारण्यात आलेला होता. अशा परिस्थितीत इच्छेविरूध्द इस्लाम धर्म स्विकारण्यास भाग पडलेल्या लोकांना पुन्हा हिंदू धर्मात समाविष्ठ करण्यासाठी जिजाबाईने धडपड केली. स्वधर्मात परत येण्याच्या बाबतीत हिंदू धर्मियांनी केलेली मनाई त्यांच्या मनाला बोचत असे. त्यामूळे असा जाचक नियम मोडित काढण्यासाठी जिजाबाईने इ.स. १६५७ मध्ये मराठा मंडळाला एकत्रित बोलावून शुध्दीकरणाचे महत्व पटवून दिले.जिजाबाईने फलटनच्या बजाजी निंबाळकरापासून शुध्दीकरणाचा उपक्रम प्रारंभ केला. बजाजी अनेक वर्ष मुस्लिम व्यक्ति म्हणून जीवन जगत होता. आपला मूळ हिंदू धर्म सोडुन मुसलमान म्हणून जगणे त्यास कालांतराने दु:खदायक वाटू लागले. अशा स्थितीत बजाजीने पुन्हा हिंदू धर्माचा स्वीकार करावा असे जिजाबाईने त्यास सुचविले. धर्मषास्त्राप्रमाणे हिंदू धर्मात घेण्यासाठी जिजाबाईने शिखर शिंगणापूरच्या पुरोहिताकडून शास्त्रोक्त विधी करून बजाजी निंबाळकरांचे शुध्दीकार्य पार पाडले. त्याप्रित्यर्थ पुरोहिताला जिजाबाईने वार्षीक दोनशे रूपयांचे इनाम दिले. शुध्दीकरण करतांना समाज मान्यता आवश्यक असते याकरिता जिजाबाईने स्वत: पुढाकार घेवून बजाजी निंबाळकरांचे पूत्र महादजीशी आपली नात सखुबाईचा विवाह लावून दिला. यामूळे निंबाळकर घराण्याला सामाजिक प्रतिष्ठा लाभली. अशाप्रकारे शुध्दीकरणाचा महान आदर्ष जिजाबाईने सतराव्या शतकातच समाजापूढे ठेवला.

सतराव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात स्त्रियांची स्थिती दयनिय होती. स्त्रियांवरील अत्याचार ही नित्याची बाब होती. गोरगरिबांच्याच नव्हे तर प्रतिष्ठीत घराण्यातील स्त्रियांना सुध्दा सुरक्षितता नव्हती. स्त्रियांवर होणा—या अत्याचाराने जिजाबाईला मणस्वी यातना होत. अबला स्त्रियांच्या आर्त किंकाळया ऐकुन त्यांचे हृदय पिळवटत असे. त्यामूळेच स्त्रियांना सर्व प्रकारची सुरक्षितता मिळावी म्हणून जिजाबाईनेधडपड केली. स्त्री रक्षणाचे कार्य आपल्या पूत्राच्या हातुन व्हावे या दृष्टीने त्यांनी षिवाजीच्या मनावर स्त्री सन्मानाचा महान संस्कार रूजविला. परस्त्री मातासमान माणणारा, स्त्री सुरक्षिततेची काळजी घेणारा, शत्रुंकडीलही स्त्रियांचा सन्मान करणारा आणि प्रगतीशील विचार बाळगून त्यावर अंमल करणारा शिवाजीराजा जिजाबाईने घडविला. स्त्री ही विटंबना करणारी वस्तू नाही तर तिला समाजामध्ये सन्मानाचे स्थान मिळाले पाहिजे असा शिवाजींचा दृष्टीकोन होता. त्यांनी स्त्रियांवर अत्याचार करणा—या गुन्हेगारांना कडक शिक्षा दिल्या. जिजाबाईने शिवाजीमार्फत स्त्री अब्रुचे रक्षण केले.

महाराष्ट्रात ब्राम्हणापासून षुद्रवर्गापर्यंत सती प्रथा प्रचलित होती. सती जाणारी स्त्री आपल्या माहेर व सासरच्या कुळाचा उध्दार करते असे धर्मपंडितांनी भासविले. धर्माचा पगडा असल्यामूळेच स्त्रिया सती जाण्याला प्रवुत्त होत असे. २३ जानेवारी १६६४ रोजी शहाजीराजांचे निधन झाले. तेव्हा पतीवरील निस्सीम प्रेमामूळे जिजाबाईने सती जाण्याचा विचार केला. परंतू शिवाजीमहाराजांनी मातेला सती न जाण्याची विनंती केली. अशावेळी पुत्राला स्वराज्य कार्यात मार्गदर्शन करण्यासाठी जिजाबाईने सती जाण्याचा निर्णय मागे घेतला. कुलीन घराण्यातील प्रथा बाजुला सारून जिजाबाईने स्त्री जातीसमोर एक नवा आदर्श निर्माण केला. त्यांनी आपल्या सुदसदविवेक बुध्दीने कर्तव्य श्रेष्ठ समजुन स्वत:ला स्वराज्यकार्यात गुतंवून घेतले. जिजाबाईने केलेले हे सतीप्रथेविरूध्दचे बंडच होते. पती निधनानंतर आपली कर्तव्ये सोडुन स्त्रियांनी सती गेलेच पाहिजे असे कुठेलही बंधन नसल्याचे त्यांनी स्त्रियांना पटवून दिले. त्यामूळे महाराष्ट्रात सती प्रथेला आळा बसला.

हिंदूधर्मशास्त्रानुसार समुद्रमंथन निशीध्द मानले जात असे. हजोरा वर्षापासून हिंदूधर्मात ही बुरसट विचारसरणी तग धरून होती. त्यामूळे समुद्रसंचार करण्याचा विचार हिंदूच्या डोक्यात कधी येत नव्हता.

समुद्र ओलांडने पाप आहे असे हिंदू धर्मग्रंथानी सांगितले म्हणूनच सतराव्या शतकापर्यंत कोणत्याही हिंदू शासकाने राज्यसंरक्षणाच्या दृश्टीने समूद्रावर आरमार उभारले नव्हते. मात्र स्वराज्याचा विस्तार समुद्रकिणा—यापर्यंत झाल्यामूळे संरक्षणाच्या दृष्टीने समुद्रवरही मराठयांचे नियंत्रण प्रस्थापीत होणे गरजेचे बनले ही वास्तविकता लक्षात घेवून परंपरागत धार्मिक निशेध मोडित काढून जिजाबाईने शिवाजीमहाराजांना सागरावर आरमार उभारण्याचा सल्ला दिला. त्यानूसार इ.स. १६५९ मध्ये मराठा आरमाराची उभारणी करण्यात आली.

जिजाबाई कट्टर हिंदू धर्माभिमानी असल्यातरी त्यांचा धार्मिक दृष्टीकोनअतिशय उदार व सहिष्णू होता. त्यांनी इतर धर्माचा कधीही द्वेष केला नाही. जिजाबाईने शिवाजीमहाराजांना सर्वच धर्माचे संरक्षण करण्याची षिकवण दिली. मातोश्री जिजाबाईच्या धर्मसहिश्णूतेच्या विचाराला कृतीमध्ये उतरवून सर्वधर्मसमभावाचा महान आदर्श शिवाजीमहाराजांनी प्रस्थापीत केला. त्याकाळात सर्वत्र कर्मकांड आणि जातीव्यवस्थेचे स्तोम जानलेले असतांना जिजाबाईने अस्पृष्य समजल्या जाणा—या जातीतील मुलांना स्वत:च्या मुलांप्रमाणे प्रेम दिले. म्हणुनच शिवाजीला अठरापगड जातीतील सवंगडी मिळाले. विविध जातींमध्ये ऐक्याची भावना वाढविण्याचा प्रयत्न जिजाबाईने केला. म्हणूनच स्वराज्याच्या नोकरित ब्राम्हण,मराठा, कायस्थ, कुणबी, भंडारी, कोळी, रामोशी, महार, मातंग, मुसलमान, पठान, या सर्वांना गुणवत्तेनुसार काम करण्याची संधी दिली.अषाप्रकारे चार्तुवर्ण्यावर अप्रत्यक्ष प्रहार करून विविध जाती व धर्मपंथांच्या लोकांना स्वराज्यकार्यात सामावून घेवून जिजाबाई व शिवाजीमहाराजांनी सतराव्या शतकातच सामाजिक अभिसरण घडवून आनले.

हिंदू धर्मातील मुर्ख धर्मपंडितांनी असा सिध्दांत सर्वत्र रूढ केला होता की, परशुरामाने २१ वेळा पृथ्वीवर क्षत्रियांचा नि:पात केल्यामूळे कलियूगात जगात कुणीही क्षत्रिय नाहीत. कुणी क्षत्रियच नसल्यामूळे राजा होण्याचा कुणालाही अधिकार नाही. असा नतभ्रष्ट आत्मघातकी सिद्धांत सतराव्या शतकातील उत्तर व दक्षिणेतील मुस्लिम राजवटींमध्ये किंकर्तव्यमुढझालेल्या ब्राम्हण धर्मपंडितांनी तो उचलून धरला. पुरोगामी विचारांचा प्रभाव असलेल्या जिजाबाईला नि:क्षत्रियत्वाचा बुरसट विचार पटला नाही. पृथ्वीवर अजुनही क्षत्रिय अस्तित्वात असून त्यांना राजा बनण्याचा अधिकार आहे हे सिध्द करण्यासाठी आपल्या पुत्राचा राज्याभिशेक सोहळा पार पाडण्याचा जिजाबाईने निष्चित केले. त्याकरिता पुरोगामी विचारसरणीचाकाशीचा विद्वान पंडित गागाभट्टांकडून ६ जून १६७४ रोजी जिजाबाईने आपला पुत्र शिवाजीचा राज्याभिषेक करवून घेतला. त्यामूळे शिवाजी महाराजांना हिंदू राजा म्हणून प्रतिष्ठा मिळाली. राज्याभिषेकामूळे नि:क्षत्रियत्वाच्या खोटया कल्पनेला मुठमाती देण्यात जिजाबाई यशस्वी ठरल्या. अषाप्रकारे प्रत्येकजन स्वतंत्र राजपदाची निर्मिती करू शकतात हे त्यांनी संपूर्ण जगाला दाखवून दिले.

## निष्कर्ष :—

भारताच्या इतिहासातील कर्तृत्वषालिनी स्त्रियांमध्ये राजमाता जिजाबाईचे स्थान अनन्यसाधारण आहे. मराठी स्वराज्याच्या संस्थापकाची जडणघडण करणा—या शिवाजीमहाराजांच्या मातोश्री म्हणून जिजाबाईची कामगिरी भुषणावह तर आहेच, परंतू सतराव्या शतकाच्या क्षितीजावरील जिजाबाई सारख्या एका स्त्रिचे सामाजिक क्षेत्रातील कार्यही अतुलनीय ठरते. सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील प्रतिगामी स्वरूपाच्या चालिरितींचा कठोर समाचार घेवून जिजाबाईने समाजाला विज्ञानवादाची कास धरण्यास प्रवृत्त केले व समाजमनातून दैववाद,निरर्थक रूढी, अंधश्रद्धा दूर करण्यात मोलाची भूमिका बजावली. म्हणूनच महाराश्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील त्या आद्यसुधारक ठरतात.

## संदर्भग्रंथ सूची :—

१. व्हटकर—खरात, डॉ.ज्योती — मराठा आणि पेशवे कालखंडातील महाराष्ट्रातील कर्तबगार स्त्रिया, दिलीपराज प्रकाशन पुणे, २०१०
२. भट, रा.स. — स्वराज्य समर्थक जिजामातोश्री, वोरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स मुंबई, १९७४.
३. सरदेसाई,गोविंद सखाराम — हिंदूस्थानचा अर्वाचीन इतिहास भाग—२, दामोदर सावळा ॲन्ड कपंनी बडोदा, १९०२

४. वाकसकर, सदाशिव विनायक (संपा.) —श्री शिव छत्रपतींची ९१ कलमी बखर आणि भोसले घराण्याची चरितावली,व्हिनस प्रकाशन पुणे,१९६२.
५. सोवनी, अविनाष मधुकर (संपा.)— ऐतिहासिक शकावल्या भाग —१, शब्दवेध प्रकाशक पुणे, १९९८.